मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत पंचायत समितींची पुरस्कारासाठी निवड करण्याच्या कार्यपद्धतीत बदल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२६/ प्र.क्र.४१०/यो-११

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ

फोर्ट, मुंबई ४०० ००१

दिनांक : ०९ ऑक्टोबर, २०२६

<u>वाचा :</u>

ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-११२३०५७/यो-११, दि.०६.०८.२०२५

<u>प्रस्तावना:-</u>

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत संदर्भाधिन शासन निर्णयान्वये, अभियानामध्ये पंचायत समित्यांनीही उस्फुर्त व सक्रीयपणे सहभाग घ्यावा याकरिता पंचायत समितींना पुरस्कार देण्याची तरतुद करण्यात आली असुन ती पुढीलप्रमाणे आहे:-

ग्रामपंचायतींना प्राप्त गुणांकनाच्या आधारे काढलेल्या टक्केवारीनुसार सर्वाधिक गुण प्राप्त ३ पंचायत समितींची महसुली विभागस्तरावर विभागस्तरीय अत्युत्कृष्ट पंचायत समिती म्हणून निवड करण्यात येईल. तसेच या विभागस्तरावरील अत्यत्कृष्ट प्रथम २ पंचायत समितींचे राज्यस्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून, सर्वाधिक गुण प्राप्त ३ पंचायत समितींची राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट पंचायत समिती म्हणून निवड करण्यात येईल.

तथापि, सदर तरतुदींमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:</u>

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सन २०२५-२६ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचायत समित्यांची पुरस्कारासाठी निवड करण्याकरिता पंचायत समिती क्षेत्रातील ग्रामपंचायतींची कामगिरी, विविध स्तरांवरील गुणांकनातील तफावत, ८५ पेक्षा जास्त गुण प्राप्त ग्रामपंचायतींची संख्या यांचा विचार करून पुढीलप्रमाणे गुणांकन पद्धती निश्चित करण्यात येत आहे.

अ.क्र.	निकष	गुण
१.	ग्रामपंचायत कामगिरी निर्देशांक (Gram Panchayat Performance Index)	६०
२.	गुणांकन सातत्य तफावत निर्देशांक (Scoring Consistency Gap Index)	३०
३.	उच्च कामगिरी निर्देशांक (High Performance Index)	१०
	एकूण	**१००**

२. तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सन २०२५-२६ करिता पंचायत समितींचे विभागस्तरावरील पुरस्कार रद्द करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६१००९१९२६२७४७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B86249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2026.10.09 19:41:11 +05'30'

(प्रशांत पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शु. व क्रीडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्य मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.विधानपरिषद/विधानसभा सदस्य,
८. अध्यक्ष, जिल्हा परिषद, सर्व,
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१०. सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, मुंबई,
११. विभागीय आयुक्त, सर्व,
१२. जिल्हाधिकारी, सर्व,
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
१३. निवडनस्ती यो-११.